# सर्वात प्रबळ रिपू 'काम'

श्रीमद् नामचैतन्य भानुदास
दि. २९-१२-२००९
दैनिक सकाळ, मुंबई यांच्या सौजन्याने

'काम' हा रिपू सर्वात प्रबळ आहे. कारण या रिपुशी दोन देह आणि दोन मनांचा संबंध आहे. प्रजोत्पत्तीसाठी 'काम' हा अत्यावश्यक असल्याकारणाने सनातन(हिंदू) संस्कृतीत या रिपुकडे पवित्र नजरेने पाहण्यात आलं. म्हणूनच शुभ-विवाह, मंगल-मीलन, मनोमीलन इत्यादी शब्द प्रचलित झाले. एवढं कशाला खजुराहो इथे कामशास्त्रावर आधारित शिल्पं असलेली मंदिरंही उभारली गेली. मात्र खेदाची गोष्ट अशी, की वात्सायन ऋषींनी लिहिलेल्या कामशास्त्रावरील ग्रंथात स्त्रीला अतिशय गौण स्थान दिलं गेलं आहे. संभोगासनांच्या शेवटी, स्त्री अशाप्रकारे उपभोगावी असं मार्गदर्शन ग्रंथात केलं गेलं आहे. खरं तर स्त्री ही काही उपभोग्य वस्तू नाही. कदाचित हा पुरुषप्रधान संस्कृतीचाच प्रभाव असावा. अध्यात्म-विज्ञानाला मात्र हे मुळीच मान्य नाही. स्त्री देखील एक मानवी देह असून तिला देखील संवेदनशील मन असतं, हे सत्य विसरून चालणार नाही. या दृष्टिकोनातूनच अध्यात्म-विज्ञानाने काम या रिपुतील लक्ष्मणरेषा आखून दिली आहे. 'संभोग' हा काम रिपुतील व्यवहार्य भाग आहे, तर 'कामासक्ती' हा त्याज्य भाग आहे. कामासक्ती असणारी व्यक्ती भिन्नलिंगीयांवर 'बलात्कार'च करते. आता संभोग आणि बलात्कार यांची फोड करू. सम+भोग=संभोग. 'सं' म्हणजे 'सह'. म्हणजेच सहभोग. याचाच अर्थ पती आणि पत्नी या दोघांचीही शारीरिक स्थिती आणि मानसिक अवस्था समागमास पोषक असेल तरंच त्याला 'संभोग' म्हणता येईल. यात दोघंही समान उपभोग घेऊन तृप्त होतात. पती-पत्नी पैकी एकाची शारीरिक किंवा मानसिक स्थिती समागमास योग्य नसेल आणि दुसऱ्याने बळाचा वापर करून जबरदस्तीने समागम केला तर अध्यात्म-विज्ञान त्यालाही बलात्कारंच मानेल. मग ती पती-पत्नी का असेनात. पाश्चिमात्यांची या रिपुकडे बघण्याची नजर पूर्णत: भिन्न आहे. पाश्चिमात्यांच्या मते संभोग ही शारीरिक भूक आहे. ज्याप्रमाणे शारीरिक भुकेला अन्नाची, तहानेला पाण्याची, श्वसनाला प्राणवायूची तसंच शरीराला मल-मूत्र विसर्जनाची गरज असते, त्याप्रमाणे शरीराला संभोगाचीही गरज असते. अन्न, पाणी किंवा प्राणवायू शरीराला मिळाला नाही अथवा मल-मूत्र विसर्जनच झालं नाही तर माणूस मरेल. अध्यात्म-विज्ञानाप्रमाणे मात्र संभोग झाला नाही तर माणूस मरत नाही. तसं झालं असतं तर बालब्रह्मचारी, कुमारिका, विधूर, विधवा हे वार्धक्यापर्यंत जिवंत राहूच शकले नसते. अध्यात्म-विज्ञानाने 'काम' हा मनोविकार मानला आहे. 'काम' मनात उत्पन्न झाल्याशिवाय शरीर साथ देत नाही. वार्धक्यात शरीर साथ देत नसतानाही मनात काम उत्पन्न झाला तर चरफड होते ती मनाचीच. तेव्हा काम रिपू हा शरीरापेक्षा मनाशीच जास्त निगडित आहे.